# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

MERC

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी: ०२२–२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२–२२१६ ३९७६
ई–मेल: mercindia@merc.gov.in संकेतस्थळ : www.mercindia.org.in / www.merc.gov.in


**प्रकरण क्र. २०१४/११२** **जाहिरात क्र. – ०६/२०१४–१५**

## जाहीर नोटीस

### दि टाटा पॉवर कंपनी लि. यांना पारेषण परवाना मंजूर करण्यासंबंधी विद्युत अधिनियम, २००३ (विअ, २००३) च्या कलम (१५) च्या उप–कलम (५) च्या खंड (ए) खाली नोटीस

१. **दि टाटा पॉवर कंपनी लि. (टीपीसी)** ने, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ सह कलम १५ मधील तरतुदीनुसार विजेचे पारेषण करण्यासाठी पारेषण परवाना १६ऑगस्ट, २०१४ पासून २५ वर्षांच्या कालावधीकरिता मंजूर करण्याकरिता दि. २३ मे, २०१४ रोजी अर्ज केला आहे. टीपीसीने त्यांच्या परवाना मागणीच्या अर्जात असे नमूद केले आहे की, पूर्वी विविध गट कंपन्यांना जे चार परवाने देण्यात आले होते त्या कंपन्या टाटा पॉवर कंपनीत सन २००० मध्ये विलीन झाल्या आहेत आणि या परवान्यांतर्गत टीपीसी सध्या विद्यमान पारेषण परवानाधारक आहे. या परवान्यांमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आल्या असून त्यांची वैधता १५ ऑगस्ट, २०१४ रोजी संपत आहे.

२. **टीपीसी**ने, मुंबई शहर आणि मुंबई उपनगर क्षेत्र, मिरा–भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये विद्यमान आणि प्रस्तावित पारेषण वाहिन्या आणि संग्राही केंद्रांसह (ज्यामध्ये मुंबई क्षेत्राबाहेरील देखील समाविष्ट असतील) विजेचे पारेषण करण्याकरिता पारेषण परवाना मंजूर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे.

३. **टीपीसी** चे नोंदणीकृत कार्यालय बॉम्बे हाऊस, २४ होमी मोदी स्ट्रीट, मुंबई – ४०० ००१ येथे आहे.

४. **टीपीसी**कडे मुंबई शहरात पसरलेल्या सुमारे ११४० सर्किट किलोमीटर लांबीच्या पारेषण वाहिन्या २२० केव्ही/११० केव्ही सह २० संग्राही केंद्रे असून त्यांची ट्रान्सफॉर्मेशन क्षमता ३१ मार्च, २०१४ रोजी ८८७३ एमव्हीए (अर्जासोबतच्या परिशिष्ट ६ व ७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे) आहे. त्यांनी यामध्ये आणखी २४ संग्राही केंद्रे, ११५५ बेज, १२६६ सर्किट किलोमीटर (उपरी आणि जमिनीखालील) लांबीच्या पारेषण वाहिन्यांची आर्थिक वर्ष २०१४–१५ ते आर्थिक वर्ष २०१८–१९ या कालावधीत भर घालण्याचे (अर्जासोबतच्या परिशिष्ट ८ व ९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे) प्रस्तावित केले आहे.

५. पारेषण परवाना मंजूरीसाठीच्या अर्जामध्ये प्रस्तावित केलेल्या पारेषण वाहिन्या, उप–केंद्रे आणि संलग्न उपकरणे यांच्या तपशीलासाठी इच्छुक व्यक्तीने टीपीसीने पारेषण परवाना मंजूरीसाठी सादर केलेला अर्ज कृपया पाहावा.

६. **टीपीसी** ने विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १५ च्या उप–कलम (२) सह मविनिआ (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ मधील विनियम ६ नुसार, त्यांच्या पारेषण परवाना अर्जाची नोटीस 'फायनान्शिअल एक्स्प्रेस' आणि 'डीएनए' या दोन इंग्रजी वर्तमानपत्रांत आणि 'लोकसत्ता' आणि 'प्रहार' या दोन मराठी वर्तमानपत्रांत दि. १३ जून, २०१४ रोजी प्रसिद्ध केली.

७. वर्तमानपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेल्या वरील अर्जाच्या नोटीशीच्या संदर्भात, जनतेकडून कोणत्याही सूचना आणि हरकती प्राप्त झालेल्या नाहीत.

८. मविनिआ (पारेषण परवाना अटी) विनियम २००४ नुसार, **पर्याय १** मध्ये पारेषण परवान्याचे क्षेत्र महाराष्ट्र राज्य राहील असे विनिर्दिष्ट करण्यात आले आहे आणि **पर्याय २** मध्ये असे विनिर्दिष्ट करण्यात आले आहे की, परवाना, विशिष्ट पारेषण वाहिन्या, उप–केंद्रे आणि संलग्न उपकरणे स्थापित करण्यासाठी व चालविण्यासाठी असेल. टीपीसीने पारेषण परवाना मंजुरीसाठी सादर केलेल्या अर्जात **पर्याय १** खाली **मुंबई पारेषण क्षेत्रासाठी क्षेत्र विशिष्ट पारेषण परवाना** आणि **पर्याय २** खाली **मुंबई बाहेर स्थित असलेल्या संग्राही केंद्रांसह पारेषण वाहिन्यांकरिता वाहिनी विशिष्ट पारेषण परवाना**, या दोन्ही परवान्यांचे एकत्रीकरण केले आहे.

९. विद्युत अधिनियम २००३ च्या कलम १५ (४) खाली महाराष्ट्र राज्याच्या राज्य पारेषण कंपनी (एस टी यु) कडून त्यांच्या दिनांक २७ जून, २०१४ च्या पत्राने शिफारस प्राप्त झाली आहे. राज्य पारेषण कंपनीने अशी शिफारस केली आहे की, टीपीसी ला (एक) मुंबई पारेषण क्षेत्रासाठी परवाना आणि (दोन) संग्राही केंद्रांसाठी (किंवा पारेषण संग्राही केंद्रे) आणि मुंबईबाहेर स्थित असेलेल्या पारेषण वाहिन्या ज्या टीपीसीच्या मालकीच्या आहेत किंवा ज्या बांधण्याचे प्रस्तावित करण्यात आले आहे, ज्या महाराष्ट्राच्या राज्यांतर्गत पारेषण यंत्रणेचा भाग असतील आणि ज्या आयोगाने मान्यता दिलेल्या राज्य पारेषण कंपनीच्या योजनेत आहेत, त्यांच्याकरिता परवाना मिळून, एकत्रित एक परवाना मंजूर करण्यात यावा.

१०. वर नमूद केलेल्या बाबींच्या अनुषंगाने, आयोग, सन २००६ मध्ये सुधारणा केलेल्या महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (पारेषण परवाना अटी) विनियम, २००४ नुसार, अर्जदाराने अधिनियम व विनियमातील सर्व आवश्यकतांची पूर्तता करण्याच्या अधीन राहून, वरील पर्याय २ अंतर्गत अर्जदारास पारेषण परवानाधारक म्हणून परवाना देण्याचे प्रस्तावित करीत आहे.

११. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम (१५) च्या उप–कलम (५) च्या खंड (ए) अंतर्गत याद्वारे, आयोगाने **टीपीसी** ला वितरण परवाना मंजूर करण्याच्या प्रस्तावाच्या संदर्भात **सूचना किंवा हरकती**, असल्यास, त्या मागविण्यासाठी नोटीस देण्यात येत आहे. या **सूचना किंवा हरकती** वरील पत्त्यावर आयोगाकडे **गुरुवार, दि. ७ ऑगस्ट, २०१४** रोजी किंवा त्यापूर्वी खाली सही करणाऱ्यास प्राप्त होतील अशा बेताने पाठवाव्यात. या तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या सूचना किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

१२. **टीपीसी** ने आयोगाला सादर केलेल्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या जोडपत्रांसह आयोगाच्या www.mercindia.org.in / www.merc.gov.in या संकेतस्थळांवर किंवा कोणत्याही व्यक्तिला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ मध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचे पालन करून आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

१३. इच्छुक व्यक्तींनी त्यांच्या **सूचना किंवा हरकती**, असल्यास इंग्रजी किंवा मराठी भाषेत, (६ + १) प्रतींमध्ये, त्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई–मेल आयडी, असल्यास, त्यासह पाठवाव्यात. तसेच **सूचना किंवा हरकती** कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहकांच्या वर्गवारीच्या वतीने दाखल करण्यात येत असल्यास तसे त्यात नमूद करावे. तसेच सूचना किंवा हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिला त्याचे म्हणणे आयोगासमोर व्यक्तिशः मांडावयाचे असल्यास तसे देखील त्यात नमूद करण्यात यावे, म्हणजे अशा व्यक्तीला आयोगातर्फे **मंगळवार दि. १२ ऑगस्ट, २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता, १३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०००५.** येथील आयोगाच्या कार्यालयात आयोजित करण्यात येणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १७ जुलै, २०१४**

**स्वाक्षरी/–**
**सचिव, मविनिआ**